drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
18 Mar, 2025

## Total Mention 8

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
| --- | --- | --- | --- | --- |
| 4 | N/A | N/A | 4 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
| --- | --- | --- | --- | --- |
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
| --- |
| 4 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Prabhat | Adani Group | Pune | 1 |
| 2. | Saamana | Growth hub in Mumbai boosts Adani's investment | Mumbai | 3 |
| 3. | Sakal | Can ineligible slum dwellers buy a rental house | Mumbai | 3 |
| 4. | Punyanagari | Dharavi is bustling with the atmosphere of Shiva, Shiv Jayanti celebrations are in full swing | Mumbai | 4 |

Prabhat • 18 Mar • Dharavi

Adani Group

| 1 • PG | 157 • Sqcm | 21915 • AVE | 196.12K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Pune

# अदानी-फडणवीस यांची बंदद्वार चर्चा

मुंबई, दि. १७ - उद्योगपती गौतम अदानी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात रविवारी रात्री उशिरा सागर बंगल्यात झालेली भेट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे. धारावीनंतर गोरेगाव येथील मोतीलालनगर पुनर्विकास प्रकल्पाचे काम अदानी समूहाला मिळाले आहे. हा संपूर्ण प्रकल्प ३६ हजार कोटींचा आहे. मात्र, राजकीय वर्तुळातील जाणकार सूत्रांच्या मते, धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि नवी मुंबई विमानतळ प्रकल्प हेदेखील दोघांमधील भेटीमागील मुख्य कारण असल्याचे मानले जात आहे.

The meeting between industrialist Gautam Adani and Chief Minister Devendra Fadnavis at Sagar Bungalow on Sunday night has sparked political discussions. After securing the Dharavi redevelopment, Adani Group has also won the Motilal Nagar project in Goregaon. Sources suggest that discussions likely centered around Dharavi and Navi Mumbai airport projects.

Saamana • 18 Mar • Dharavi

Growth hub in Mumbai boosts Adani's investment

3 • PG | 1080 • Sqcm | 641445 • AVE | 910K • Cir | Bottom Left

Mumbai

# मुंबईतील ग्रोथ हबमुळे अदानींच्या गुंतवणुकीला चालना

## महायुतीचे 'अदानी जिथे जिथे, ग्रोथ हब तिथे तिथे' धोरण अदानींच्या पथ्यावर



मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) – मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) ग्रोथ हब सुरू करण्याकरिता निवडण्यात आलेल्या जागा पाहता राज्याच्या अर्थसंकल्पातील ही घोषणा अदानी समूहाच्या गुंतवणुकीला चालना देणारी ठरणार आहे. कारण, ग्रोथ हबकरिता निवडण्यात आलेल्या बहुतांश ठिकाणी मोदी सरकारच्या काळात भरभराटीला आलेल्या अदानी समूहाने मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे महायुती सरकारच्या या 'अदानी जिथे जिथे, ग्रोथ हब तिथे तिथे' धोरणामुळे भविष्यात महामुंबईची ग्रोथ झाली नाही तरी अदानीची निश्चितपणे होणार आहे.

यापैकी एक केंद्र वांद्रे-कुर्ला संकुलात, तर दुसरे वडाळा येथे असेल. धारावी पुनर्विकासाच्या नावाखाली इथल्या ३०० एकरसह बाजूचा २४० एकरचा भूखंड अदानीला आंदण देण्यात आला आहे. या भूखंडावर प्रति बीकेसी उभारण्याची योजना आहे. बीकेसी आणि वडाळ्याला लागून असलेल्या ग्रोथ सेंटरची फळे धारावीत उभ्या राहणाऱ्या अदानीच्या साम्राज्याला चाखायला न मिळतील तरच नवल! याशिवाय विलेपार्ले येथे २ बिलियन अमेरिकन डॉलर्स खर्चून जिओच्या बीकेसीमधील वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरला तगडी स्पर्धा देईल असे इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर सुरू करण्याची अदानीची योजना आहे. यालाही सरकारच्या ग्रोथ सेंटरमुळे पाठबळ मिळेल.

तिसरे केंद्र कुर्ला येथे असेल. इथली मदर डेअरीची २१ एकरची जागाही धारावीच्या विकासाच्या नावाखाली कोणतेही टेंडर न मागविता नाममात्र दराने आधीच अदानीच्या घशात घातली आहे.

चौथे ग्रोथ सेंटर गोरेगावमध्ये असेल. येथील १४२ एकरवरील मोतीलाल नगरच्या पुनर्विकासाचे काम अदानीला मिळाल्यात जमा आहे. याशिवाय नवी मुंबई, खारघर येथे दोन ग्रोथ सेंटर असतील. मे महिन्यात सुरू होणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे संचलन अदानींकडे असल्याने या दोन्ही केंद्रांचा फायदा इथले दळणवळण वाढविण्यास होणार आहे. हेही अदानीच्या पथ्यावरच पडेल.

आणखी एक ग्रोथ सेंटर वरळी येथे असेल. वांद्रे-वरळी सी लिंकला वांद्रे येथे लागून असलेला एमएसआरडीसीच्या २४ एकरच्या भूखंड विकासाचे काम अदानीला बहाल केले आहे. त्यामुळे भविष्यात वरळी येथे विकसित होणाऱ्या ग्रोथ सेंटरचा फायदा अदानीच्या या भूखंडांवरील उद्योगांनाही होणार आहे.

### *ग्रोथ हब काय...*

*मुंबई महानगर प्रदेश आंतरराष्ट्रीय दर्जाचे विकास केंद्र म्हणजेच ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याची योजना महायुती सरकारने अर्थसंकल्पात आखली आहे. त्यात पाच वर्षांत मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० बिलीयन डॉलर्सवरून ३०० बिलियन डॉलर्सवर नेण्याचे गाजर दाखविण्यात आले आहे.*

The Mahayuti government's Growth Hub initiative in Mumbai Metropolitan Region (MMR) will boost Adani Group's investments in areas like Bandra-Kurla, Wadala, Goregaon, and Navi Mumbai. Adani's projects, including Dharavi redevelopment and an international convention center, will enhance MMR's economy, aiming to grow from $5 billion to $50 billion in five years.

Sakal • 18 Mar • Dharavi

## Can ineligible slum dwellers buy a rental house

| 3 • PG | 250 • Sqcm | 165040 • AVE | 352.42K • Cir | Top Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# अपात्र झोपडीधारकांना खरेदी करता येईल भाड्याचे घर?

मुंबई, ता. १७ : धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत धारावीतील पात्र झोपडीधारकांना धारावीतच घरे दिली जाणार असून, अपात्र ठरणाऱ्यांना मुंबईतच भाडेतत्त्वावर घरे दिली जाणार आहेत. सदरची घरे संबंधित भाडेकरूला एकरकमी पैसे देऊन खरेदी करता येणार आहेत; मात्र राज्य सरकारची रेंटल हौसिंग पॉलिसी मंजूर झाल्यानंतर त्याबाबतचे चित्र आणखी स्पष्ट होणार आहे.

धारावीतील अपात्र झोपडीधारकांना मुंबईतच भाडेतत्त्वावर घरे देण्याची धारावी पुनर्विकास प्रकल्पाची (डीआरपी) योजना आहे. त्यानुसार संबंधितांना ८-१० हजार रूपये मासिक भाड्याने सदरची घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. त्यासाठी कर्ला, मुलुंड, देवनार, मालाड अशा वेगवगेळ्या ठिकाणी भाडेतत्त्वावर घरे दिली जाणार आहेत. ३० वर्षानंतर संबंधिताला त्या घराची मालकी मिळू शकणार आहे; मात्र काहींना भाड्याचे घर मालकीतत्वावर हवे असेल तर ते मिळू शकणार आहे. सदर घराच्या उभारणीवर झालेल्या खर्चाच्या आधारे त्याची किंमत ठरणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

Under the Dharavi redevelopment project, eligible hut holders will receive houses in Dharavi, while ineligible ones will be provided rental houses in Mumbai. These rental houses can be purchased after three years, depending on the state government's rental housing policy. Locations like Kurla, Mulund, Deonar, and Malad are planned for this.

Punyanagari • 18 Mar • Dharavi

## Dharavi is bustling with the atmosphere of Shiva, Shiv Jayanti celebrations are in full swing

| 4 • PG | 118 • Sqcm | 64856 • AVE | 72.24K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# शिवकालीन वातावरणात दुमदुमली धारावी, शिवजयंती उत्सव शिगेला

**धारावी :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती धारावीत मोठ्या धूमधडाक्यात साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण धारावीत धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवजयंती साजरी करण्यासाठी शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गट, मनसे रस्त्यावर उतरल्याने धारावीतील वातावरण भगवेमय झाले होते. ध्वनिक्षेपकावर सुरू असलेले



पोवाडे, भगव्या पताका, शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यासमोर भगवे फेटे, सफेद कुर्ता परिधान केलेल्या शिवप्रेमींचा गराडा पडल्याने शिवकालीन वातावरण तयार झाले होते.

सोमवारी सकाळपासूनच धारावीतील रस्त्यावर घुमणारा पोवाड्यांचा आवाज, सत्यनारायण पूजा, शिवचरित्रावरील व्याख्याने तसेच नाक्यानाक्यावर स्थानापन्न झालेले महाराजांचे अर्धपुतळे, रस्त्याची शोभा वाढवत होते. मोठ्या दिमाखात आणि भगव्या वातावरणात शिवसेना ठाकरे गटाची शिवजयंती मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत धारावी विधानसभा प्रमुख माजी नगरसेवक वसंत नकाशे, धारावी विभाग संघटक विठ्ठल पवार, उपविभागप्रमुख जोसेफ कोळी यांच्यासह महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले.

पारंपरिक प्रथेनुसार छत्रपतींची मिरवणूक धारावी मेन रोडवरील लक्ष्मीबाग शाखेजवळून बँजो व ढोलताशांच्या गजरात निघाली. मिरवणुकीला सुरुवात होताच घोड्यावर आरूढ झालेले छत्रपती शिवाजी महाराज, माता जिजाऊ व मावळ्यांना पाहून परिसरातील नागरिक भारावून गेले.

Under the Dharavi redevelopment project, eligible hut holders will receive houses in Dharavi, while ineligible ones will be provided rental houses in Mumbai. These rental houses can be purchased after three years, depending on the state government's rental housing policy. Locations like Kurla, Mulund, Deonar, and Malad are planned for this.

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Mid-Day | The anekantvada of Mr Jain | 7.5M |
| 2. | Pudhari | Stock Market \| "या" शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ, जाणून घ्या मार्केटची चाल कशी असे... | N/A |
| 3. | Urban Acres | Adani Realty Grows Its Presence in Mumbai Redevelopment | N/A |
| 4. | origin.mid-day.com | The anekantvada of Mr Jain | N/A |